# साप्ताहिक सकाळ

दिवाळी ९१
१६ रुपये



# स्वतःच्या शोधात वीणा सहस्रबुद्धे

**सत्यशील देशपांडे**



*मैफल ! मग ती गाण्यांची असो की गप्पांची. सूर जमले की चढत्या क्रमाने रंगत जाते. वीणा सहस्रबुद्धे यांच्या गाण्याच्या मैफिलीच्या चाहत्यांना, त्यांची गप्पांचीही मैफल ऐकायला मिळावी या हेतूनं त्यांची सरधोपट मुलाखत न घेता, त्या आणि सत्यशील देशपांडे यांच्या गप्पा आखल्या. संगीत क्षेत्रात नव्यानं स्थिरावलेल्या या कलावंतांच्या गप्पांची रंगलेली मैफलच इथं दिली आहे. या गप्पात 'साप्ताहिक सकाळ'चे सदा डुम्बरे, संध्या टाकसाळे, गायक विजय सरदेशमुख आणि वीणाताईंचे पती श्री. हरी सहस्रबुद्धे हेही सहभागी झाले होते. या गप्पांच्या ध्वनिफितीचे शब्दांकन केलं आहे वर्षा दीक्षित यांनी.*

**तुमच्यात आणि माझ्यात बरंच साम्य आहे. मी वामनराव देशपांडे यांचा मुलगा. आमच्याकडे गाणं होतं. त्या निमित्ताने कलाकार घरी यायचे. तुमच्याकडेही तसंच होतं. कुमारजी, तुमच्या वडिलांबद्दल म्हणजे -शंकरराव बोडस यांच्याबद्दल -बोलायचे. व्यक्ती म्हणून आणि त्यांच्या निष्ठेबद्दल, त्यांनी कानपूरसारख्या ठिकाणी जाऊन जे काम केलं, त्याबद्दल कुमारजी आत्मियतेनं बोलत. तुमच्याबद्दल तेव्हा मला काही माहीत नव्हतं. विष्णू दिगंबर पलुस्करांच्या, संगीताचा प्रसार व्हावा या ध्येयाला अनुसरून, अलाहाबादला कशाळकर गेले. कानपूरला शंकररावजी गेले. उत्तरेत तेव्हा काही नव्हतं. लाहोरमध्ये विद्यालयाची स्थापना झाली. नॉर्थ म्हणजे 'सॉर्ट ऑफ बॅरनलँड !' तिकडे शास्त्रीय संगीताची पार्श्वभूमी नव्हती. शेवटी 'एनी कल्चर इज ए कल्टिव्हेटेड टेस्ट' अशा प्रकारचं काम शंकररावजींनी केलं. त्यामुळे तुम्ही ज्या काही आहात त्याचा धागादोरा इथे कुठे असला पाहिजे. त्याबद्दल जरा सांगा.....**

''माझ्या घरी गाणं होतं. आम्ही दोघंही -म्हणजे मी व माझा भाऊ तात्या -भाग्यशाली आहोत. पण घरी गाणं असल्याचा फायदा होतोय, संस्कार होताहेत हे तेव्हा मला जाणवलं नाही. फक्त वाटायचं की, ही सारी मंडळी बोलताहेत, सांगीतिक चर्चा होताहेत. बस्स, इतकंच जाणवायचं.

**जेव्हा तुमची सांगीतिक संवेदना फारशी नसेल तेव्हा, म्हणजे तुमच्या लहानपणी कोणकोण घरी यायचे ?**

''मी माझ्या वडिलांना त्यांच्या म्हातारपणी पाहिलं आहे. त्यांच्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी माझा जन्म झाला. मला जेव्हा थोडंसं कळायला लागलं, तेव्हा ते साठीचे होऊन गेले होते. सुरवातीला माझ्या आठवणीप्रमाणे पं. ओंकारनाथजी, नारायणराव व्यास, पं. विनायकबुवा पटवर्धन आमच्याकडे यायचे ! ते तिथे वारंवार येत. तसे ते आमचे गुरुबंधू आहेत.

**पण महाराष्ट्रात विनायकबुवांचं जरा अंडरएस्टिमेशन झालं....**

''हो, इथं आल्यावर मला तसं कळलं.''

**विनायकबुवा हा टिंगलीचा विषय इथं आहे.... पण या लोकांनी, उत्तरेत तळागाळापासून शास्त्रीय संगीताचं वातावरण तयार केलं....**

''हो, हो, काही काही संगीतसभा त्यांना दरवर्षीच बोलवायच्या. कधी -कधी सहा -सहा महिन्यांसाठी ते यायचे. ओंकारनाथजी तर बनारस हिंदू विद्यापीठातच होते. त्यांनी संगीताचा स्वतंत्र विभागच सुरू केला. ते सगळे माझ्या वडिलांचे सीनिअर म्हणजे गुरुबंधूच ! अलाहाबादला कशाळकर होते, 'बाबूजी' म्हणत त्यांना. एक आपटे म्हणून होते. वामनराव ठकार होते. लखनौमध्ये भातखंडे संगीत विद्यालय होतं, तिथले रातंजणकरअण्णा यायचे, तेव्हा गप्पा -गाणी व्हायची. एवढंच आठवतंय. के. जी. गिंडे आणि भट हेही यायचे.

''निवृत्तीबुवा (सरनाईक) आमच्याकडे बऱ्याचदा येऊन राहायचे. मला घरी 'बेबी' म्हणतात. ते म्हणायचे, 'बेबी, तू थोडंसं म्हणून दाखवं. एखादं भावगीत म्हण.' मी म्हणून दाखवलं, की त्यांना खूप आनंद व्हायचा. माझ्या वडिलांना ते म्हणत, 'तुमची मुलं गाताहेत हे केवढं भाग्य आहे ! आमची मुलं गातच नाहीत.

बसवराज येऊन राहिल्याचं आठवतंय. माझ्या वडिलांनी तिकडे एक संगीतसमाज सुरू केला होता, तिथे या सगळ्यांचे कार्यक्रम व्हायचे. रवीशंकरजी आणि अली अकबरखाँसाहेब यांची जुगलबंदी कानपूरला तेव्हा बरीच गाजली. तेव्हा बरेच कार्यक्रम झाले. पण मला त्याबद्दल विशेष असं आठवत नाही. मात्र, निवृत्तीबुवा, बसवराज यांना मी एखादं भावगीत, हिंदी भजनसुद्धा म्हणून दाखवल्याचं आठवतयं !''

**पण हे सगळे लोक यायचे, त्या वेळी तुमचे वडील तुम्हाला शिकवायचे का ?**

''तो भाग वेगळा. तुम्ही कोण -कोण यायचे म्हणालत ना म्हणून सांगते. तर श्रुती सडोलीकर यांचे वडील आमच्याकडे पंधरा दिवस येऊन राहिल्याचं आठवतंय. त्यांनी माझ्या आईला शिकवलं आहे. तेव्हा मी दहावी / अकरावीत होते. भीमसेनजीही आमच्याकडे राहिले आहेत. हॉटेलपेक्षा बोडस यांच्या घरी सोय करा असं ते म्हणत

मग तेव्हा तुम्ही भावगीत किंवा चीजा गायच्या, ते....

''ते मी ऐकून केलेलं.

म्हणजे तुम्ही 'याच' क्षेत्रात यावं असं तुमच्या वडिलांनी ठरवलं नव्हतं ?

''नाही, नक्कीच नाही ''

माझ्या वडिलांनी तसंच केलं. ते म्हणायचे, ''तुझा रस्ता तुला शोधायला पाहिजे. मी जयपूर घराण्याचा म्हणून तूही त्याला वाहून घ्यावंस असं नाही. पण त्यांनी माझ्यावर काही लादलं नाही. त्यानंतर मी कुमारजींकडे गेलो. त्यांच्याकडे तीन वर्षं राहिलो. मुकुल माझा गुरुबंधू. त्या वेळी समजा 'बिहाग' राग घेतला तर कुमारजी म्हणायचे ''फैय्याजखाँसाहेब याचा काय मजा घ्यायचे'' किंवा ''रामपूरवाल्यांनी असं पाह्यलं''. पण तुमचा रस्ता तुम्ही शोधा असं ते म्हणायचे नाहीत. तुमचा 'खड्डा' तुम्ही शोधा असं म्हणायचे ! आता तुम्ही जे काय कमावलंय, मिळवलंय त्यात जाणते-अजाणतेपणी वडिलांनी तुम्हाला घडवण्याचा प्रयत्न केला नाही. कुमारजींच्याबद्दल असं म्हणतात की, कुमारजी जेव्हा देवधरांकडे गेले तेव्हा, देवधर स्कूलचं स्वरूप होतं एक 'अड्डा' ! त्यांच्याकडे गुणी लोक यायचे. विविध घराण्याच्या लोकांनी तिथे जाऊन आपलं गाणं ऐकवावं, तिथल्या उपस्थितांनी त्याला मान्यता द्यावी अगर देऊ नये असं त्यांचं स्वरूप होतं देवधर कुमारजींना म्हणायचे, ''हे बघ, याचं हे चांगलं आहे, त्यांचं ते चांगलं आहे.'' पण तेच कुमारजी जर एका गुरूकडे समजा, केसरबाईकडे शिकायला गेले असते तर, विथ ऑल हिज व्हर्सटॅलिटी ही कुड हॅव बीन कनफाइन्ड टू अ पर्टिक्युलर डिसिप्लीन शेवटी काय असतं की, तुमचा आवाज, तुमचं सांगीतिक व्यक्तीमत्व जे घडतं, ते स्वतः घडविण्याची संधी तुम्हाला राहत नाही. तुमच्या वडिलांनी तुम्हाला विशिष्ट घराण्याच्या मुशीत घातलं नाही. ही भाग्याचीच गोष्ट आहे. त्याबद्दल जरा बोला.

''आमचे दादा, संगीत क्षेत्रात कसे आले ?'' हा मोठा ऐकण्यासारखा भाग आहे. विद्यालयात त्यांना किती शिकायला मिळालं ? महाराजांच्या सहवासात किती राहिले ? महाराज म्हणजे विष्णू दिगंबर पलूस्कर ! देवधर मास्तर आणि वडील सांगलीला बरोबर शिकलेले आहेत, ते साधारण एक-दोन वर्षांच्या अंतराने महाराजांकडे गेले. तेव्हा -

महाराज त्यांच्या ज्येष्ठ शिष्यांना सांगायचे, 'अरे, तुम्ही त्यांचा वर्ग घ्या' आणि मग ओंकारनाथजी, पं. विनायकबुवा माझ्या वडिलांना शिकवायचे. वडिलांना थोडंसं महाराजांचंही मार्गदर्शन मिळालं, पण किती ? जास्तीतजास्त सात-आठ वर्षं !

कानपूरला काँग्रेस अधिवेशन झालं, बहुतेक १९२५-२६ साल असेल. तेव्हा महाराज तिथे गेले होते. तिथे पृथ्वीराजसिंग म्हणून भले गृहस्थ होते. त्यांना महाराजांचं गाणं अतिशय आवडलं. ते महाराजांना म्हणाले, ''तुमचा एखादा शिष्य इथे ठेवून जा !' तेव्हा महाराज माझ्या वडिलांना म्हणाले, 'जे काही गाणं तुझ्याकडे आहे, त्याचा तू इथे राहून प्रसार कर' आणि मग माझे वडील सांगलीहून कानपूरला आले. तेव्हाचा उत्तरेकडला भाग म्हणजे गाण्याला फारशी प्रतिष्ठा नव्हती. तिथल्या सांस्कृतिक, सामाजिक परिस्थितीमध्ये गाणं रुजणं कठीण होतं. हे सगळं वातावरण बघितल्यावर, वडील म्हणाले, 'मला ज्यासाठी महाराजांनी इथं पाठवलं तशा प्रकारे मी प्रसार करू शकणार नाही !'

शाळेमध्ये माझ्या वडिलांना, संगीत शिकवण्यास सांगण्यात आलं, पृथ्वीराजसिंग यांनी, हिंदीतली पदं त्यांना दिली. त्याला बाबांनी चाली लावल्या. बरोबर नोटेशन काय आहे इ. त्यांनी सांगायला सुरवात केली. एकदा एक गोरा माणूस शाळेत इन्स्पेक्शनला आला, तो चकितच झाला, खूषही झाला आणि त्यांनी वडिलांना लगेच दोन इन्क्रिमेंट्स द्यायला



सांगितलं. म्हणजे 'कुठकुठे ते ग्वाल्हेर गायकी शिकणं आणि कुठे मुलांना असं समूह गायन शिकवणं ! नंतर पहिली – दुसरीतल्या मुलींना समजतील अशा काव्यरचना वडिलांनी स्वतःच केल्या. ' लेलो, गुब्बारे लेलो', 'ना मंदिर में' अशी गाणी तयार केली. ''संगीत ही काय 'शिकायची' गोष्ट आहे ?' असा लोकांच्या मनातला अपसमज त्यांनी दूर केला. सामान्य लोकांना समजतील अशा चाली त्यांनी लावल्या.''

**बोडस घराणं मूळचं कुठलं ?**

''सांगली. माझा जन्म कानपूरचा. सांगलीला आम्ही अधूनमधून येत असू. माझी आई इचलकरंजीची. वडील सांगलीचे.

**औपचारिक संगीत शिक्षणाची सुरवात कुठे झाली ?**

कानपूरलाच ! माझ्या वडिलांकडे आणि भावाकडे ! ... हं इथं एक सांगावसं वाटतंय की, जेव्हा वडील कानपूरला आले तेव्हा बलवाजोशी नावाच्या गृहस्थांना माझ्या वडिलांनी तिकडे बोलावून घेतलं. शेषगिरी वासुदेव जोशी या महाराजांच्या नरगुंदच्या शिष्यालाही तिथे बोलावून घेतलं, हळूहळू त्यांनी आपला समाज तिकडे आणला.

**तुमच्या वडिलांना घरात गाण्याची पार्श्वभूमी ?**

''नाही, माझ्या वडिलांचे वडील गाडगीळ सराफांकडे होते. गाण्याचं काहीही वातावरण नव्हतं. उलट, बालगंधर्वांच्या नाटकाला माझे वडील गेले होते, म्हणून त्यांनी आजोबांच्या हातचा 'मार' खाल्लाय ! मात्र, माझ्या वडिलांचा आवाज खूप गोड होता.''

**तुमचं औपचारिक शिक्षण किती ?**

''गांधर्व महाविद्यालयाची नृत्याची पहिली परीक्षा मी केली. मी तेव्हा सहा–सात वर्षांची होते, कथ्थक शिकले

**शाळेचं कॉलेजचं शिक्षण...**

''शाळेमध्ये नेहमीचे सगळे विषय घेऊन, हिंदी माध्यमात शिकले. सातवीपर्यंत शाळेत संगीत शिक्षक नव्हते, त्यानंतर होते.

**तुम्ही पदवीधर कधी झालात ?**

१९६८ मध्ये इंग्रजी, संस्कृत, संगीत हे विषय घेऊन ! त्यानंतर १९७९ मध्ये मी एम.ए. केलं, संस्कृतमध्ये.

माझ्या वडिलांचं म्हणणं होतं की, (प्रत्येक शब्दावर जोर देत) 'तू गाणं करू नकोस !' तू तुझ्या शिक्षणाकडे पाहा ! गाण्यात तुला काही आलं पाहिजे असा माझा मुळीच आग्रह नाही ! त्याचं कारण असं की, माझ्या वडिलांना शिक्षणाची फार आवड होती. पण कानपूरला आल्यामुळे शिकता आलं नाही.

**''मी कॉलेज शिक्षण केलं. तर त्याचा मला भयंकर त्रास व्हायचा, मला बी. कॉम.ला ऑनर्स मिळूनही असं वाटायचं की, हे काही खरं नाही. तुम्हालाही तसंच वाटायचं का ?''**

''नाही ! माझ्या भावाला – काशिनाथला – गाण्याची अत्यंत ओढ होती. माझ्या वडिलांचं म्हणणं की 'तू पदवीधर तरी हो.' पण पुस्तक उघडलं तरी तो गुणगुणायचा. त्याच्या उलट, सुरवातीपासून दादांची सुप्त इच्छा मी जाणली होती. ते करून मला दाखवायचं होतं. १९ व्या वर्षी मी पदवीधर झाले. मला 'डॉक्टर' व्हायचं होतं. पण मला तेव्हा कोणी योग्य मार्गदर्शन केलं नाही. कारण वडिलांचं घरी विशेष लक्ष नसायचं, त्यांनी बाहेर स्वतःला 'इतकं' वाहून घेतलं होतं की, आम्ही काय करतोय ? किती येतंय ? हे त्यांना माहीत नसायचं. पण जर त्यांनी मला तू डॉक्टर हो, अशी सूचना दिली असती, तर मी 'गायलेच' नसते !' मी अजिबात या क्षेत्रात आले नसते. गाणं मला आवडत होतं, पण माझ्या भावाला जितकं आवडायचं, तितकी काही ओढ मला नक्कीच नव्हती. शिक्षणात उच्च श्रेणी मिळवायची हे जे माझ्या डोक्यात भिनवलं गेलं त्यामुळेच गाण्याकडे मी फारसं लक्ष दिलं नाही.''

> ''लग्नानंतर मात्र मला गाणं कानावर पडलं नाही की, चुकल्यासारखं वाटायचं. आमच्या माहेरी तानपुरा कायम वाजतच असे. सहस्त्रबुद्धे यांच्या घरी ध्वनिमुद्रिकांचा उत्तम संग्रह होता. पण लावलेली रेकॉर्ड संपली की, पुन्हा शांतता ! मी म्हटलं, 'इथं मीच जर तंबोरा वाजवला तर वाजेल. तेव्हाच मला जाणवलं की, आपल्यात गाणं कुठंतरी खोलवर आहे.''

''संगीतात 'करिअर' करण्याचा माझा विचार नव्हता; पण काहीतरी करायचं होतं. मग ते संगीत असो की आणखी काही असो, कुठंतरी 'माझं नाव' झालं पाहिजे. बस !''

**पारंपरिक पद्धतीनं शिक्षण घेऊन, गुरूने**

## वीणा सहस्त्रबुद्धे



**वीणा सहस्त्रबुद्धे यांना घरातूनच संगीताचा वारसा मिळाला आहे. त्यांचे वडील कै. शंकरराव बोडस हे पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांचे शिष्य होते. लहानपणी वीणाबाई कथ्थक शिकल्या, तेव्हाच संगीतातल्या ठेक्याशी त्यांचा परिचय झाला. वडील आणि ज्येष्ठ बंधू पं. काशिनाथ बोडस यांनी त्यांना ख्याल शिकविला. पद्मश्री बळवंत भट, पंडित वसंत ठकार आणि पंडित कै. गजाननबुवा जोशी यांसारख्या महान कलाकारांकडूनही त्यांनी संगीताचे धडे घेतले.**

**कलाकार म्हणून आपलं गाणं वीणाताईंनी अनेक सन्माननीय ठिकाणी पेश केलं आहे. ग्वाल्हेरचा 'तानशेन समारोह', आय. टी. सी. सम्मेलन, शंकरलाल महोत्सव, पं. विष्णू दिगंबर जयंती, (दिल्ली) तसेच, एन. सी. पी. ए.चे टाटा थिएटर, (सेंट झेवियर्स, मुंबई), 'डोवर लेन अॅन्ड संगीत रिसर्च अकादमी' (कलकत्ता) ही त्यांपैकी काही नावं !**

**अनेक संस्थांतून तसंच, खासगीरीत्या त्यांनी स्वतः संगीत शिकवलं आहे. एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या पुणे कँपसमध्ये संगीत विभागाच्या त्या प्रमुख आहेत. (सध्या एका प्रकल्पासाठी प्रदीर्घ रजेवर).**

**त्यांची गायकी मुख्यतः ग्वाल्हेर घराण्याची ! पण केवळ त्यावरच समाधान न मानता त्यांनी स्वतःची अशी खास शैली निर्माण केली आहे. समीक्षकांनी आणि जाणकारांनी ती नावाजली आहे. ख्याल गायकी बरोबरच सुमधुर भजनेही त्यांनी गायलेली आहेत.**

**एच. एम. व्ही.ने नुकतीच मारुबिहाग आणि नट भैरव रागातील त्यांची कॅसेट आणि रेकॉर्ड प्रसिद्ध केली आहे, तर ऱ्हिदम हाऊसने त्यांच्या पाच ध्वनिमुद्रिका काढल्या आहेत. ऋतुचक्र या नाविन्यपूर्ण ध्वनिमुद्रिकेचा त्यात समावेश आहे.**

**वीणा सहस्त्रबुद्धे या संस्कृतमध्ये एम. ए. असून 'संगीत प्रवीण' आहेत.**

## सत्यशील देशपांडे



**सुप्रसिद्ध गायक वामनराव देशपांडे यांचे, सत्यशील देशपांडे हे चिरंजीव. घरात संगीताचं वातावरण आणि भीमसेन जोशी, हिराबाई, मोगूबाई, कुमार गंधर्व, किशोरी आमोणकर अशा विविध कलाकारांचा सतत राबता, त्यामुळे वेगवेगळ्या घराण्यांतल्या चांगल्या गायकीचा परिचय सत्यशील देशपांडे यांना झाला. बी. कॉम. झाल्यानंतर सत्यशील यांनी कुमारजींच्या जवळ तीन वर्षे गुरुकुल पद्धतीनं शिक्षण घेतलं. सवाई गंधर्वांपासून अनेक महोत्सवांत त्यांनी आपलं गाणं पेश केलं आहे. ते चालीही बांधतात.**

**१९८८ मध्ये फोर्ड फाऊंडेशनतर्फे सत्यशील देशपांडे यांना एका प्रकल्पासाठी अनुदान मिळालं आहे. ''गतस्मृतीत जात चाललेल्या उत्तर हिंदुस्थानी संगीताच्या परंपरांचं जतन'' असा या प्रकल्पाचा विषय आहे. जुन्या-जाणत्या संगीतकारांच्या, तसेच जे प्रसिद्धीच्या झोतात नाहीत त्यांच्याही संगीताच्या ध्वनिफिती तयार करून त्यांचं जतन करण्याचं काम सत्यशील यांच्या 'संवाद फाऊंडेशन'तर्फे चालतं.**

**नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'लेकिन' या चित्रपटातील गाण्यांसाठी त्यांना आशा भोसले यांच्याबरोबर विभागून बक्षीस मिळालं आणि सत्यशील देशपांडे हे नाव जनसामान्यांपर्यंत जाऊन पोहोचलं.**

**सांगितल्यापलीकडे जाण्याची ज्यांची इच्छा नाही असे आणि ज्यांनी औपचारिक शिक्षणाचा लाभ घेतलेला आहे आणि त्यातल्या महत्त्वाच्या गोष्टी घेऊन, स्वतःच्या मनाने, प्रज्ञेने त्यात प्रयोग करणारे असे दोन प्रकार असतात. अभ्यासक्रमासाठी विषय जे तुम्ही निवडले त्याचा संगीतात पुढे काही उपयोग झाला का ?**

'मी कथ्थक नृत्य शिकले ! शिवाय सतार ! सतारीवर माझा हात चांगला चालायला लागला होता. फक्त गाणंच करायचं नाही तर काहीतरी वेगळं करायचं असं मी ठरवलं, म्हणून मी बी.ए.पर्यंत सतार वाजवत होते. नृत्यातही मी बरंच केलं. पण प्रकृतीच्या कारणामुळे मला नृत्य सोडावं लागलं. मला गाण्यापेक्षा 'नृत्य' अधिक आवडत होतं. पण ते थांबवावं लागलं. म्हणून मग सतार शिकायचा प्रयत्न केला. पण योग्य वेळ, योग्य तंत्र सांगू शकेल असं कोणी सापडलं नाही.

''लोक म्हणायचे, 'ही गात का नाही ?' पण माझ्या वडिलांनी कधी सक्ती केली नाही. माझ्या वडिलांनी कधीही कोणावर टीका केली नाही. काय आवडलं ते सांगत, घेण्यासारख्या गोष्टीच ते सांगत ही त्यांची महत्त्वाची गोष्ट.''

**लग्न कधी झालं ?**

पदवीनंतर लगेचच ! अगदी 'अॅरेंज्ड मॅरेज' ! लग्नानंतर मात्र मला गाणं कानावर पडलं नाही की, चुकल्यासारखं वाटायचं. आमच्या माहेरी, तानपुरा कायम वाजतच असे. घरी 'संगीतमय' वातावरण होतं. सहस्रबुद्धे यांच्या घरी असं नव्हतं. मात्र त्यांनाही संगीत आवडत होतं. त्यांच्याकडे ध्वनिमुद्रिकांचा उत्तम संग्रह होता; पण लावलेली 'रेकॉर्ड' संपली की पुन्हा शांतता ! मी म्हटलं 'इथे 'मीच' जर तंबोरा वाजवला तरच वाजेल. तेव्हाच मला जाणवलं की, 'आपल्यात गाणं कुठेतरी खोलवर आहे ! ही जाणीव मला पहिल्यांदच झाली ! मग मी हळूहळू तंबोरा घेऊन बसू लागले. त्याला एक निमित्त झालं. आमच्या दादांची वीणा शुक्ल नावाची एक शिष्या होती. तीही अमेरिकेला जाऊन, आठ – दहा वर्षांनी पुन्हा कानपूरला परत आली. तिने माझ्या गाण्याबद्दल चौकशी केली. मी म्हटलं 'अब क्या ? शादी भी हुई, लडका भी हुआ, वो गाने नहीं देता' वगैरे वगैरे. तरी ती म्हणाली, 'नही, तुम कुछ 'सुनाओ', दादाने जो चीज सीखाई थी ! वो गाओ. मी म्हटलं, 'देखते है, बहोत दिनसे गुनगुनाया भी नही' असं म्हणून मी तिला ती 'चीज' ऐकवली ! ती खुश !

'ती मुलगी दररोज माझ्याकडे येऊन बसायची, म्हणायची ती 'चीज' मला शिकव ! तर मी जे थोडंफार विसरले होते, ते मी आठवायला लागले, तिच्यामुळे !'

**कुठली चीज ?**

'' 'जयजयवंती !' हे, मी का सांगते की, माहेरी मला स्वतःलाच समजलं नाही की, मी गाण्याच्या किती जवळ आहे. इथे मात्र, आय वॉज मिसिंग समथिंग.'

**मग तंबोरा घेऊन आपणच बसावं असं कधी वाटलं ?**

''जरा पार्श्वभूमी सांगू का ? माझ्या वडिलांना विविध क्षेत्रात रस होता, त्यातून आपला जावई 'पीएच.डी.' आहे म्हणजे स्वर्गाला हात पोचले ! तर मला वडिलांनी काय सांगावं ? 'हरीचं सगळं व्यवस्थित व्हायला हवं. त्याच्या वेळा वगैरे आधी सांभाळायच्या ! गाणं वगैरे नंतर.' तेव्हा मला जरा इनफिरिऑरिटी कॉम्प्लेक्स आला मग आपल्याला काय करता येईल असा प्रश्न पडला. कानपूर आय.आय.टी. शहरापासून लांब होतं. मुलगा लहान होता. त्यामुळे कॉलेजमध्ये जाणं शक्यच नव्हतं. शिवाय सहस्रबुद्धे यांच्या घरी सगळे प्रोफेसर, डॉक्टर, इंजिनिअर ! सासऱ्यांना मात्र गाण्याची खूप आवड होती. कृष्णराव पंडितांचे ते भक्त होते. माझ्या सासू-सासऱ्यांकडे ग्वाल्हेरला गेल्यावर मला कोणी सहज विचारलं की, 'ही काय करते ?' की माझ्या डोळ्यांतून नकळत पाणी यायचं ! तेव्हा मी म्हटलं, की असं सहज विचारणंसुद्धा आपल्याला 'लागतंय', त्याचा आपल्याला त्रास होतोय, तर जे आपल्याला येतंय, तेच म्हणजे गाणं जरा 'पॉलिश' करून पाहूया. त्यात काही 'गती' येतेय का ? मग मी आईला पत्र लिहिलं. आईनं सांगितलं 'तू ऑल इंडिया रेडिओ कॉम्पिटिशनला बस. तेवढेच तुझे दोन राग तयार होतील !' आणि मग मी तयारीला सुरवात केली. तोपर्यंत मी विशारद, अलंकार वगैरे झालेच होते. त्यामुळे तेवढे राग झालेले होते. 'आलापी येतेय ?' टिकमार्क ! 'बोल आलापी ?' 'हो' टिकमार्क ! असं जे 'टिकमार्क' असतं ते झालेलं होतं. आणि सुरेलपणाबाबत सांगायचं तर काशिनाथ मला म्हणायचा, ''मी तुझी शिकवणी सगळ्यांच्या नंतर घेईन ! आणि दिवसभरातला सगळा 'बेसूरपणा' मी विसरून जाईन ! कारण तू बेसूरही गात नाहीस आणि बेतालही ! मी तयारीला सुरवात केली. अधूनमधून काशिनाथला जाऊन विचारायचे की, तुला काय सुचेल ते तू सांग, तो सांगायचा.

'त्या स्पर्धेमध्ये लखनौला माझा नंबर आला ! मग दिल्लीलाही नंबर आला ! माझ्या वडिलांच्या मित्राने त्यांना तार पाठवली की, तुमच्या मुलीचा नंबर आला आहे ! वडील आले, म्हणाले, 'अगं वीणा, तुझा नंबर आलाय ! त्यांना 'हिचा नंबर आला ?' म्हणजे हिनं काय केलं ? असं आश्चर्य वाटलं.

''मग भावानं सांगितलं की, ती येत होती, तिचा तोडी राग करून घेतला.

तेव्हा दादांनी मला सांगितलं, 'बेबी, तू गा'! 'म्हटलं चला ! त्यांनी परवानगी दिली !

''पण मग मी अमेरिकेला गेले आणि पुन्हा तुटलं गाणं ! पण मी म्हटलं जे येतंय त्याला गंज लागू द्यायचा नाही. दिवसभर सगळी कामं करून रात्री अकरा वाजता मी गायला बसायची. कोणी ऐको

अगर न ऐको, कितीही दमलो तरी आपण जेवतोच ना ? तसं दररोज तंबोरा घेऊन बसायची. मी करत राहिले. खूप तास नाही बसले, पण जे काही बसले ते खूप लक्ष देऊन बसले. सुरवातीचे यमन, मालकंस,बागेश्री, बिलावल, भैरव, तोडी असे एकेक राग घेऊन जितकं सुचतंय...'


**ओंकारनाथजी, कुमारजी किंवा आणखी कोणी जसे गातात, तसं आपण गावं अशी स्टेज कधी त्या वेळीहोती का ?**

''हो, हे कुमारजी गायचे आमच्याकडे. १९५८-६० ची गोष्ट. ते आले की भाऊ तंबोरे जुळवायचे ते मी लक्षपूर्वक पाहायची. मग कुमारजी गायचे. पण 'ते' गाऊन गेले की, आम्हाला काहीच सुचायचं नाही. मग मी भावाला म्हणायची, 'हे आलं गाणं नाही !हे गाणं आपल्याला येऊच शकलाही ! फक्त सुरेलपणा येईल कान तिखट होतील. कुमारजींचं गाणं ऐकल्यावर दोन-चार दिवस गायचंही नाही. त्यांचं गाणं डोक्यात बसून राहावं ! त्याच सुमारास निवृत्तीबुवा, ओंकारनाथजी यायचे. त्यांचं गाणं थोडंसं

> सुरेलपणाबाबत सांगायचं तर माझा भाऊ काशीनाथ मला म्हणायचा, ''मी तुझी शिकवणी रात्री सगळ्यांच्या नंतर घेईन आणि दिवसभर ऐकलेला सगळा 'बेसूरपणा' विसरून जाईन ! कारण, तू बेसूरही गात नाहीसआणि बेतालही.''

समजायचं. म्हटलं, हे जरा 'चिमटीत' पकडता येतंय ! हिराबाई, मालिनीताई, भाईही यायचे. लक्ष्मीशंकरची कानपूरला खूप जोरात लाट होती. त्यांच्या आवाजाचं मला खूप आकर्षण होतं. माझा आवाज गळ्याचा खूप उंच होता. मी लता मंगेशकरची गाणी गायचे, काळी एकमध्ये !लता मंगेशकरचं भयंकर आकर्षण होतं. तानसेन समारोहात जे मी गायले, त्यावर लक्ष्मीशंकरची खूप 'छाप' जाणवते. अखिल भारतीय स्पर्धेत नंबर मिळवणाऱ्याला तिथे संधी देतात. मग मी किशोरीताईंची 'भूप', 'बागेश्री'ची रेकॉर्ड ऐकली. म्हटलं, 'काय गाणं आहे ! हे खरं गाणं ! मी एकदम 'गार' !

'त्याआधी मी त्यांचं गाणं फारसं ऐकलं नव्हतं. त्याआधी माणिक वर्मांची जोगकंस आणि भटियार ! ती-एल.पी मी किती घासावी ? पार तुकडे पडेपर्यंत ऐकले ! म्हटलं, याच्याहून चांगलं गाणंच नसतं ! त्या रेकॉर्डवरून मी जोगकंसचे बडाख्याल, आलाप इ. इ. लिहून बसवले. नंतर भटियारही बसवला. टेप केला. रेडिओत गायले ! इतका माणिकताईंचा माझ्यावर पगडा बसला होता !



**अब जो 'खिचडी' पक गयी है, जो मसाला है, उसमे वीणा सहस्रबुद्धे है क्या ?**

दरम्यानच्या काळात मल्लिकार्जुन मन्सुरांचं ऐकलं तेव्हा आम्ही राष्ट्रीय संगीत संमेलनाचा कार्यक्रम रेडिओवर ऐकायचो. म्हणायचो, 'अरे!! काय षड्ज लागतोय ! हे चांगलं- ते चांगलं...''

**मन्सुरांच्या गायकीतलं काय प्रभावी वाटलं ?**

'स्वरांचं सातत्य. एक संपलं की एक, असं... असं वाटतं की आपण डोलतोय ! षड्जातली एक वेगळीच 'मजा' दाणेदार आणि पेचदार ताना !''

**''निवृत्तीबुवांच्या तानेत 'कन्टेंट' जास्त आहे, तानेतला जो विचार आहे त्याबद्दल .....**

''हो, हो आहे ना , निवृत्तीबुवा माझ्या भावाला काही शिकवायचे ते मी ऐकलं. डबलताना वगैरे बघत गेले. श्रोता म्हणून ऐकत गेले.''

**मल्लिकार्जुनांच्या गाण्यातली सूत्रबद्धता आवडली. तसं माणिकताईंच्या गाण्यातलं काय आवडलं ?**

''मी असं म्हणेन, तालाशी सुसंबद्ध असं काही त्या गाण्यामध्ये बोलत असतात. त्यांचे 'पलटे' इतरांपेक्षा वेगळे वाटले. बोलताना, बोलआलापीची 'गती' वेगळी वाटली.''

**ही शास्त्रीय परिभाषा झाली; पण मराठी संस्कृतीत ज्योत्स्ना भोळे, माणिकताई गाताहेत म्हणजे, आपल्या घरातलंच कोणी गातंय असं वाटतं:...**

''हो, हे पण आहे, 'गोड आव' आणून कोणीतरी गातंय असं त्यांचं गाणं ऐकताना वाटत नाही.''

**जसं केसरबाई गाताना वाटतं !....**

''हं, एक मोठं' काहीतरी आम्ही करायला चाललोय आणि आता पाहा तुम्ही ! असा भाग माणिकताईंच्या गाण्यात नाही, त्यांचं गाणं 'नॅचरल' आहे ! आमच्या दादांनी आवाज कसा काढावा, हे सांगताना म्हटलं होतं; अगदी सोप्पं ! म्हणजे जसं आपण आहोत तसं बोलतो, तसंच गावं, ही त्यांची परिभाषा मला फार आवडली. बोलत असताना कसं आपण एखाद्या शब्दावर जोर देतो, कुठे स्वल्पविराम देतो, मध्येच थांबतो, तसंच आपण गाण्यातही करावं.''

''काही जणांची 'षड्ज' लावण्याची वेगळी पद्धत पाहिली की मला वाटतं, हे 'नाटकी' होतयं ! सहज असलं पाहिजे.''

**किशोरीताईंचा भूप बागेश्री ऐकल्यावर काय वाटलं ? म्हणजे शास्त्रीय परिभाषेत नाही ! पण एकदम काय वाटलं ?**

''एकदम असं वाटलं की, 'ये बहोत 'मजा' हुआ आवाज है'. हा घडविलेला आवाज आहे. इसे बनाने के लिये, बहोत कुछ किया गया है. आम्ही जसं धक्का देऊन, मुरकी, खटका करतो. हे सगळं गुळगुळीत झालेलं आहे. त्यांच्या गाण्यात नजाकत आहे, स्वर लावण्यात बात आहे. नुसतीच मींड असली की, धुपद वाटायला लागतं ! मध्येच एखादा खटका, मुरकी येते. असं वाटतं की 'बाईंनी असंच गायला हवं !

**तुम्हाला असं वाटतं का, की त्या फार 'मनस्वी' गातात ?**

''मनस्वी म्हणजे काय ?''

**म्हणजे अगदी झोकून देऊन !**

''त्यात दोन गोष्टी आहेत. त्यांचं मनस्वी वाटायला, मला मनस्वी असायला हवं ना ! तर माझ्या मनाची तेवढीतयारी पाहिजे. मात्र सुरवातीला किशोरीताईंचं

ऐकल्यावर असं वाटलं की, 'हां, कुछ बात है !' 'हे घरगुती गाणं नाही !' मला वाटायला लागलं की. त्यांच्या गाण्यात काही 'अर्थ' आहे. नुसतंच 'रे प ' किंवा 'ग म ' चाललेलं नाही. त्यातनं त्या 'काहीतरी' सांगताहेत ! हे खूप ऐकल्यावर कळलं. याला तुम्ही मनस्वी म्हणाल का ?

**'वेल स्ट्रक्चर्ड' म्हणता येईल का ?**

''नाही, काही सांगायचं आहे, कुठेतरी वेगळ्याच ठिकाणी (श्रोत्यांना) पोचवायचं आहे. कुमारजींच्या बाबतीत वाटायचं की कुठे गाणं चाललंय.. आणि 'कुठे'. आपण आहोत ! किशोरीताईचं गाणं ऐकल्यावर असं वाटायचं की, यातलं आपल्याला थोडंफार करता येण्यासारखं आहे. कुमारजींचं तर येणारच नाही !''

**ही कधीची गोष्ट ?**

''ही साधारण १९७५-७६ ची गोष्ट असावी.''

**या काळात तुमचा 'स्वतः आणि तंबोरा' असा संघर्ष चालू होता ?**

''हो, आपण करतोय, पण आपल्याला जे पाहिजे ते नाहीये असं वाटायचं.''

**तेव्हा असं जाणवलं का की, आपल्याकडे बंदिशींची कमतरता आहे, आपल्याला तालीम पाहिजे ?**

''नाही, खरं सांगायचं तर १९७४ पर्यन्त मला वेळच नव्हता. मुलांची तब्येत, येणंजाणं यातच मी गुंतलेली असायची. त्यानंतर आम्ही अमेरिकेला गेलो. नंतर-नंतर वाटायला लागलं की, आपण यात शिरलो तर आपल्याला काहीतरी करता येईल. हे सारखं वाटू लागलं, मी 'निराशावादी' नाही. कोणती गोष्ट आपल्याला येत नाही हे सहजासहजी स्वीकारणारी मी बाई नाही ! मला भयंकर संताप येतो. मी स्वतःला खूप त्रास करून घेते. तेव्हांच्या एकंदरीत परिस्थितीकडे बघून मला वाटलं, कुठे जायचं, काय करायचं, मुलांची सोय काय करायची, मुलांना घेऊन जायचं का ? माझी आईही तेव्हा नोकरी करत होती. ( १९७६ मध्ये अमेरिकेतून परत आलो तेव्हा ती रिटायर झाली.) त्यामुळे ती मोकळी नव्हती. मग मुलांना कुठेतरी ठेवून जायचं, हे मी करूच शकले नसते. मग वीणा शुक्ला म्हणाली, 'दोन-तीन मुलींना तू शिकव !' मग शिकवायला लागले. मग डोक्यात आलं, आपण संस्कृतमध्ये एम. ए. का करू नये ? तेव्हा मुलं पूर्णवेळ शाळेत जात होती. तेव्हा मी खूप लांब म्हणजे जवळजवळ पंधरा-सोळा कि.मी. नियमित लांब जाऊन एम. ए. केलं संस्कृतमध्ये आणि माझी पदव्युत्तर शिक्षणाची इच्छा पूर्ण झाली.

**मध्यंतरीच्या काळात रेडिओची पुन्हा ऑडिशन टेस्ट द्यायला लागली.**

''ते म्हणाले, पुन्हा द्या, मध्यंतरी तुमच्या गाण्यात खंड पडला आहे. मग मी ऑडिशन दिली, मला बी ग्रेड मिळाली. मग त्याचे दर दोन महिन्यांनी रेडिओवर प्रोग्रॅम मिळायचे. तेव्हा मी 'प्रयोग' करून पाहिले. जोगकंस, भटियार, मल्लिकार्जुनांची 'देसकार'मधली चीज गायले. असं जे जे काही मिळत गेले ते, घेत गेले. रेडिओचा कार्यक्रम म्हणजे दर दोन महिन्यांनी आपली 'परीक्षा' असं समजून मी ते करत राहिले. मग मी 'बी-हाय' ची ऑडिशन दिली. किशोरीताई एकदा राष्ट्रीय कार्यक्रमात 'रागेश्री' गायल्या. ते मी टेप केलं होतं. तो तसाच तयार केला. तेव्हा वाटलं की, कुठे जाण, तिथे तालीम घेणं, यापेक्षा जे उपलब्ध आहे, त्यातून काही घेता आलं तर बघूया ! मग 'छायानट'हीबसवला. 'नेवर की झनकार' या कुमारजींच्या कॅसेट्सवरून एकेक 'पलटा' केला. तेव्हा असं लक्षात आलं की, आपल्याला हे थोडंफार जमू शकेल. कॅसेट्सवरून मी खूप शिकले. मधला एक काळ होता, तेव्हा मालिनीताईचं गाणंही खूप आवडायचं.

**आपला जो 'पिंड' आहे, तो गाण्यातूनच प्रकट करायचा असं तुम्ही ठरवलं होतं का ? काम शिकत राहण्याचंही एक 'ॲडिक्शन' असत पण माणूस एक असंही करतो की, आहे त्या गोष्टींवरच**

> माणिक वर्मांचं गाणं खूप सहज आहे. आपल्याच घरातलं कुणी गातंय असं वाटतं. मुद्दाम गोड 'आव' आणून कुणीतरी गाय असं वाटत नाही.

**विसबून राहून आपण स्वतःला प्रकट (रिलीज) करू शकू का ?**

''कानपूरला आम्हाला खूप कमी ऐकायला मिळायचं त्यातून आम्ही शहरापासून दूर, 'आय.आय.टी.' कॅम्पवर राहत असू. तिथे साळेच प्राध्यापक ! ते नुसते म्हणायचे 'वीणा, तुम्हारी आवाज बहोत अच्छी है.' बसं ! एक वेळ अशी आली होती, की मी यांना म्हटलं, मी इथे 'सडत्येय !' माझी बुद्धी इथे गंजत्येय, बंद होतेय ! तेव्हाच सहस्त्रबुद्ध्यांना पुणे विद्यापीठाने विचारणा केली, आमच्या युनिव्हर्सिटित याल का ? मी यांना म्हटलं, 'आपण जाऊया !' मला पुण्याला शिकायला मिळेल, ऐकायला मिळेल. आपल्याला आणखी काय यायला पाहिजे ते समजेल. लोक काय प्रयोग करतात ते बघायला मिळेल ! त्यातून 'त्यांनाही आय.आय.टी.पेक्षा जरा वेगळं करण्याची इच्छा होती. इतर विद्यापीठं कशी आहेत ते बघायचं होतं. ते कानपूरला कॉम्प्युटर सायन्सचे 'विभागप्रमुख' होते. कानपूर आय.आय.टी. सोडून पुण्याला येणार म्हटल्यावर लोकांनी आम्हाला वेड्यात काढलं. पण पुणे विद्यापीठात कॉम्प्युटर सायन्सचा विभाग नव्याने सुरू करायचा हे एक आव्हान होतं. म्हणूनतेही राजी झाले. दोघांच्याही मतानं मग आम्ही चटकन पुण्याला आलो.''

**एखाद्याच गुरूकडून शिक्षण घ्यायचीसंधी तुम्हाला लाभली नाही, यात काही 'गमावलंत' असं तुम्हाला वाटतं का ?**

''नाही, निदान आतातरी नाही वाटत ! मला असं वाटतं की मी तेरा चौदा वर्षांची असताना जर मला वडिलांनी कोणाकडे पाठवलं असतं तर, आज



**कोणतीही गोष्ट आपल्याला येत नाही हे सहजासहजी स्वीकारणारी मी बाई नाही.**

त्रेचाळिसाव्या वर्षी जी मी आहे 'ती' लवकर झाली असते ! पण तेव्हा मी किती 'प्रगल्भ' झाले असते हा प्रश्नच आहे. आता अनुभवानं मी आपल्याला काय करता येईल, काय जमू शकेल, याचा विचार करू शकते. मात्र त्या वेळेला गुरूनं आपल्या आवाजाच्या पट्टीत मला गायला सांगितलं असतं, तर मी त्यांचंच अनुकरण केलं असतं.''

**ही तुम्हाला 'जमेची' बाजू वाटते का, की रुखरुख वाटते. आता तुम्हाला काही 'कलमं' करून घ्यायला आवडेल का ?**

''अब जो 'खिचड़ी' पक गयी है, जो मसाला है, उसमें वीणा सहस्रबुद्धे है क्या ? की वीणा सहस्रबुद्धे कहीं खो गयी है ? असा मला प्रश्न पडतो. पण हरीनं सांगितलं की 'तसं नाहीये ! वीणा सहस्रबुद्धे स्टाईल कुठेतरी आहे.' पण मला जे पाहिजे आहे ते सापडतंय की नाही ? हे अजूनही कळत नाही. अजूनही काही वेगळं करावंसं वाटतंय ! कुमारजींकडे जावंसं वाटतंय. पण मी आता त्यांच्याकडे गेले तर काय होईल ? मी अगदीच काही केलेलं नाहीये असं नाही ! पण आता मी जी काही आहे ते माझं बनलंय का ? त्यात अनेकांचा सहभाग आहे. 'मी' काय केलं ? या प्रश्नाचं उत्तर मला सापडत नाही.''

**आज तुम्हाला कोणी 'माझ्यासारखं गा' असं म्हणणार नाही. कुमारजीतर कोणालाही आपल्यासारखं गा असं सांगत नाहीत.....**

''कुमारजींचे – आम्ही आजच चाहते झालेलो नाही आहोत. त्यांनी मला माझ्या लहानपणापासून पाहिलं आहे. पण तेव्हा मी पडद्याआडून 'फक्त ऐकायचे !' म्हणून सवाई गंधर्व महोत्सवात जेव्हा मी गायले तेव्हा कुमारजींनी माझ्या भावाला विचारलं 'ही गायला कधी लागली ?' आता जर मी त्यांच्याकडे गेले, तर त्यांच्याकडच्या ज्या काही खुब्या, सुक्ष्म गोष्टी आहेत किंवा सूत्र आहे ते मला सापडलं आणि त्याचा विस्तार करता आला तर बरं होईल असं अजूनही वाटतं.''

**हे तुमचं, तुमच्याबद्दलचं मत झालं; पण इतर जण तुमचं मूल्यमापन कसं करतात ?**

''देवासला कुमारजींच्या समोर मी मागच्या वर्षी गायले. नंतर अलाहाबादला मी गेले, तिथे कुमारजींचे शिष्य राजू भेटले, (अनंत कृष्ण ) त्यांनी सांगितलं कुमारजींसह आम्ही सगळ्यांनी तुझी 'ऋतुचक्र' कॅसेट ऐकली. मी म्हटलं, 'नुसती ऐकली काय ? कैसे लगी वो बताइये !' तर ते म्हणाले, 'तंबोरे चांगले जुळवलेस !' म्हटलं 'चला !' माझे वडील म्हणायचे, 'ज्याला तंबोरे जुळवता आले त्याला पन्नास टक्के गाणं आलं !' 'पुढे ?' 'विचारही चांगला केलास, सिक्वेन्सही चांगला लावलास !' पुढे ते म्हणाले, 'वरचा षड्‌जही चांगला लावलास. पण 'देस'मध्ये 'होरी' का गायली, ते नाही कळलं'

'' 'ऋतूचक्र'मध्ये 'रंग उडत है चहूँ ओर' अशी मी एक होरी म्हटली आहे. वरच्या षड्‌जावरून 'सौंध' दिल्यामुळे एक होळीचं प्रसन्न वातावरण निर्माण झालं आहे. तर या त्यांच्या कॉमेंट्सवरून मला कुठेतरी वाटलं की आय ॲम ऑन द राइट ट्रॅक.

''वामनराव देशपांड्यांनी एकदा मला विचारलं, की 'तू 'जयपूर' कोणाकडून शिकलीस ? तर 'घराणं' हा शब्द आमच्या घरी कधी उच्चारलाच गेला नाही. मी ग्वाल्हेर घराण्याची आहे हे मला पुण्याला आल्यावर समजलं ! अमुक पलटा असा घेतला, तमुक तान तशी घेतली म्हणजे अमुक घराणं हे सगळं पुस्तकात ! वडील इतकंच म्हणायचे, की 'तुम्ही फार 'विलंबित' गाता !' दादांचं एक होतं की, अशी तान घे, तशी तान घे, असं ते सांगत; पण 'घराणं' हा शब्द ते उच्चारत नसतं. स्वरगायन आणि तालगायन हे एकमेकात मिसळलं पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष असे. तुमच्या गाण्यात 'वैविध्य' हवं असं ते म्हणत. त्यांच्याकडे 'वैविध्य' खूप होतं. देवधर मास्तरांकडून ते काय काय नवीन ऐकायचे. देवधरमास्तरांची आणि त्यांची खूप मैत्री होती.''

**कुमारजी म्हणत, बेटा तुम्ही ओंकारजी ऐकले नाहीत, उनके जमानेमें क्या गाते थे ! किंवा रहमत खाँची 'जमुना के तीर' ही चीज अब्दुल करीम खाँच्याही आधी गायलेली आहे. पलुस्करजींनी काय सुंदर नोटेशन केलंय...**

''पलुस्करांचा विषय निघालाच आहे म्हणून..... ते १९५८ मध्ये गेले असावेत. डी. व्ही. पलुस्करांना बघितल्याचं आठवत नाही. पण एक काळ असा

> ''किशोरीताईंचं गाणं ऐकल्यावर वाटलं, हा 'घडवलेला' आवाज आहे. इसे बनाने के लिए बहोत कुछ किया गया है. त्यांच्या गाण्यातही काही 'अर्थ' आहे. त्यातनं त्या 'काहीतरी' सांगत आहेत.''

होता की, मला आणि काशीनाथला वाटायचं, बापूरावांसारखं गाणं 'कठीण' आहे ! जसं कुमारांचं गाणं ऐकल्यावरही वाटायचं, दोघंही 'तुल्यबळ' आहेत. बापूरावांचं गाणं 'नॅचरल' आहे. त्याला 'पवित्र' असं मी म्हणेन. त्यांच्या गाण्यात आलापी, बोल आलापी, बोल–ताना ताना आहेत, वैविध्य आहे, लयकारी आहे. सगळं आहे, पण ते गाणं, घर पूर्ण नटवलेलं आहे ; आणि त्यातली सगळीच गोष्ट चमकते आहे, असं आहे. मात्र कुमारीजींच्या गाण्यात, एखादी गोष्ट 'वीज चमकते' तशी आपल्या डोक्यावर बसते ! त्याखाली आपण 'दबून' जातो. या दोघांचं मिश्रण असलेली एखादी व्यक्ती आली तर 'काय सुंदर होईल !' एक नवीनच गाणं तयार होईल.

''तर ओंकारनाथजी आणि कुमारजी एकाच कॅटॅगरीतले असं मी म्हणेन. ओंकारजींच्यात, नाट्यमय अभिनय त्यांच्या बोलण्याबरोबरच गळ्यातही असायचा. आवाजाचा 'फोकस' जो असतो तो दोघांच्यात आहे, मात्र स्वर–लगाव वेगळा आहे. एखादा सूर 'शार्प' दहा किलोचा लावायचा, एखादा एकदम शंभर ग्रॅमचा, ही ओंकारनाथजीची आणि पुष्कळशी कुमारजींचीही पद्धत आहे, तशी डी. व्हीं.ची पद्धत नाही. म्हणजे गायकाचं 'व्यक्तिमत्त्व' आणि 'गाणं' याचा कुठेतरी संबंध असतो. खरं तर हा संशोधनाचा विषय



**संगीतात करीयर करण्याचा विचार नव्हता.**

आहे.''

**म्हणजे कुमारजी किंवा ओंकारनाथजींची शैली मेलोड्रॅमॅटिक आहे, असं म्हणाल का ?**

''मेलोड्रॅमॅटिक हा शब्द मला वापरायचा नाही. म्हणजे ओंकारनाथजींच्या गळ्यात नाटकीय भाग जास्त वाटतो. म्हणजे नाटक नाही करायचं, पण 'असं' सादर केल्यानं श्रोत्यांना ते आवडेल, असं त्यांना वाटत असेल.''

**आपण गाताना 'काही तरी सांगायचंय' असं वाटतं का ? गाण्यावर काळाचा ठसा असतो. कालानुरूप ते आवडते......**

''हो, तसंच असतं. कालानुरूप मूल्यं बदलतात''.

**''संगीताच्या आविष्कारशैलीत कालानुरूप बदल घडतो का ?''**

''हो, जो बदल झालाय, तो चांगला झालाय आणि तो होणं अपरिहार्य होतं.''

**''तुमच्या गाण्याबद्दल सर्वसामान्य श्रोत्यांना काय वाटतं याला महत्त्व देता, की जाणकारांना काय वाटतं याला तुम्ही प्राधान्य देता. म्हणजे अज्ञ आणि तज्ज्ञ असं.....''**

(पान १४४ पाहा)

# वीणा सहस्रबुद्धे

(पान ३१ वरून)

''जाणकारांची मतं तर घ्यायलाच हवीत ! जो गायक आता श्रोता म्हणून समोर बसलेला आहे, त्यानं काय-काय ऐकलेलं असतं ! गोव्याला शांतादुर्गेच्या येथे मी गायले, समोर श्रोत्यात मोगुबाई, किशोरीताई, भाई..... 'म्हटलं जे येईल ते ते गायचं !' मी तेव्हा 'छायानट' गायले, 'झुमरा'मध्ये.

**'' 'नेवर की झनकार' का ?**

''नाही. 'नेयेरी अब गुंद लावो' ही बंदिश म्हटली. छायानटनंतर मालकंसची 'दुर्गाभवानी.' छायानटमध्ये कुमारजींसारखे काही पलटे घोटले गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी किशोरीताईंना भेटायला गेले. ती त्यांची माझी पहिली भेट ! तिथे मोगुबाईही होत्या. त्यांनी माझी चौकशी केली; मग म्हणाल्या, ''चांगली गायलीस ! मी पण ख्यालाची बंदिश अशीच मांडते.'' किशोरीताई म्हणाल्या, ''चांगली गायलीस, पण मला काही सांगायचंय, सांगू का ?'' मी म्हटलं ''सांगा''. मग त्या म्हणाल्या, ''तुझ्या गाण्यातले स्वरांचे धक्के काढून टाक. इकार, उकारामध्ये गाण्यापेक्षा 'आकारा'मध्ये गा, चल मी दाखवते तुला,'' असं म्हणून त्यांनी जवळजवळ तीन तास गाऊन दाखवलं. 'सावनी' घेतला होता. नंतर म्हणाल्या ''तू ये माझ्याकडे, मी तुला सांगते.'' त्यानंतर मी त्यांच्याकडे (किशोरीताई) गेले होते, मी त्यांचा 'रागेश्री' ऐकून बसवला होता. तो गाऊन दाखवला आणि त्यातला अंतरा शिकायला मिळेल का, असं विचारलं. किशोरीताई म्हणाल्या, ''हे कसं माझ्यासारखं गातेस ? तसंच एरवी का नाही गात ? मी म्हटलं, ''तो राग मी तुमच्याप्रमाणे बसवल्यामुळे, ते बरोबर बरोबर जातंय !''

**प्रत्येक राग मला तुमच्या पद्धतीनं गायचा नाहीये, असा तुमच्या मनातला 'भाव' त्यांच्यापर्यंत पोचला का ?**

''पहिल्याच भेटीत हे काय सांगणार ?''

**म्हणजे एका परीनं स्वत:चं वेगळेपण, अस्तित्व जपण्यात तुम्ही यशस्वी झालात !**

''हं, नंतर एका कार्यक्रमात मी 'ललितागौरी' गायले. 'प्रीतम सैय्या,' तो मी गजाननबुवांकडून शिकले. त्या आधी कोणाचा मी तो राग ऐकला नव्हता. त्यांनी मला जसं शिकवलं तसं मी गायले. नंतर मुंबईच्या एका कार्यक्रमाला ललितागौरी आणि नंतर 'नटकेदार' गायले. कार्यक्रम संपल्यानंतर किशोरीताई म्हणाल्या, ''नटकेदार, माझ्या म्हणण्याप्रमाणे मांडलास मग ललितागौरी तसा का नाही मांडलास ?'' त्यांना काय म्हणायचंय ते



श्रोत्यांचा नेहमीच विचार करते.

माझ्या लक्षात आलं, ललितागौरीमध्ये बुवांची लयकारी, स्वरांना धक्का देऊन गाण्याची पद्धत आली होती.

**''तुमच्या तानक्रियेत गजाननबुवा 'दिसतात' तर त्यांच्याकडून तालीम......''**

''हो, थोडीशी. त्यांच्याकडून मी 'हमीर' राग सहा दिवस शिकले. मग 'बसंत' घेतला. त्यांना मी म्हटलं, की एकच राग मला 'संपूर्ण' शिकवा म्हणजे त्यात तुमच्या स्टाईल्स येतील. काशीनाथनं (माझ्या भावानं) मला पत्रातून कळवलं होतं, की त्यांच्याकडून तू 'हमीर'च शिक ! कारण तो त्यांचा 'हातखंडा' राग होता.

**'चमेली फूल चंपा' का ?**

''हो, त्या गाण्यामध्ये जे निरनिराळे प्रकार आहेत शिवाय त्यांनी गाणं फुलविण्याची जी शैली सांगितली आहे, ते मी दुसऱ्या रागांमध्येही करून पाहिले. काही-काही मला येत होतं; पण मी असं ऐकलं होतं, की गजाननबुवांकडे ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर आहे; ते मला त्याबद्दल सांगू शकतील. गजाननबुवा लखनौला असताना आमच्या घरी खूपदा यायचे. तेव्हा सारखं व्हायोलीन, गाणं असं चालायचं. माझे वडील त्यांचे 'भक्त' होते.''

**''तुम्हाला नुसतीच ठुमरीची, टप्प्याची किंवा मध्यलयीची मैफल करावी असं वाटतं का ?''**

''माझ्या डोक्यात तराण्यांचीच मैफल करायची आहे.''

**''की सध्याच्याच गानप्रकाशात आपण अधिक काही देऊ शकतो, असं वाटतं ?''**

म्हणजे स्थायी गायलो. मध्ये आलापी भरली. अंतरा गायलो. त्यात आलापी घेतली, अंतरा म्हटला, मग बोलआलाप बोलताना असं रुटीन असतं. मागे अलाहाबादमध्ये शांताराम कशाळकर मला एकदा म्हणाले, की चांगलं गायलीस. सूर, आवाज चांगला लागला, सगळं चांगलं झालं; पण उसमें 'खो'जानेवाली बात नहीं थी.''

**''म्हणजे श्रोते मंत्रमुग्ध होणं, हरवून जाणं ?''**

''हो. ते म्हणाले, 'इसे तुम तुम्हारे गाने में कैसी ला सकती हो ? वो सोचो' आणि मग मी विचार केला, तेव्हा जाणवलं, की 'ती' गोष्ट आपल्याला अजून सापडायची आहे ! (प्रत्येक शब्दावर जोर देत) 'ती' गोष्ट आपल्याला अजून आलेली नाही ! दुसरी गोष्ट म्हणजे अंतऱ्याच्या नंतरची डेव्हलपमेंट ! आलापी हळूहळू येते, त्यात मी यशस्वी होते; पण अंतऱ्यानंतरची तान... मधली जी 'गॅप' आहे, त्यात काय 'मसाला' भरायचा ते मला शोधायचं आहे. एकदमच कुठंतरी धावायला लागायचं, असं न करता लयकारी, बोलआलापीच्या दृष्टीनं काही विचार करायचा आहे; पण हा (सध्याचा)

गानप्रकार मला मंजूर आहे.''

**''श्रीनिवास खळे यांच्याबरोबर तुम्ही नवीन भावगीतं करताय...''**

''हो, खळे यांचे जेव्हा मी 'अभंग तुकयाचे' ऐकले, तेव्हा ते मला फार आवडले. फारच सुंदर ! वा· क्या बात है ! शब्द, चाल, आवाज सगळंच सुंदर ! 'भेटी लागी जीवा' या गाण्यानं तर मला अक्षरशः 'वेडं' केलं. तेव्हा मी कानपूरला होते. तेव्हा वाटायचं, श्रीनिवास खळे यांना नुसतं 'बघावं !' की 'ही' चाल लावणारा 'कोण' आहे ? नंतर एकदा मी आणि माझ्या भावानं एक भजनाचा कार्यक्रम केला होता. त्याला खळेसाहेब आले होते. आमची तिकडची भजनं 'वेगळ्या' प्रकारची आहेत. त्यावर उर्दूचा थोडासा प्रभाव आहे. तर ती भजनं मी आणि काशीनाथ बरोबर गायलो. नंतर खळे म्हणाले, की तुझ्या क्लासिक गाण्यावरून तू 'असंही' गाऊ शकशील, असं वाटलं नव्हतं ! आणि मग आता आगामी कॅसेटसाठी त्यांच्याकरिता मी काही 'भावगीतं' गाते आहे, 'काय सुरेख चाली दिल्या आहेत, त्यांनी !' या आधी वडील आणि भावाव्यतिरिक्त कोणाच्या चाली मी गायले नव्हते. खळेसाहेबांबरोबर शिकताना वाटलं, की हे 'अवघड' आहे ! यात घुंघट घेऊन लयकारी असते, लपूनछपून चालणारी ही गोष्ट आहे. स्वरात शब्द टाकण्याची ही अवघड करामत आहे. मी त्यांना म्हटलं, ''अण्णा, हे कसं का जमणार ?'' ते म्हणाले, ''तू जरा गा ! म्हणजे आपोआप तुला समजेल ! आणि प्रयोग करायला मला आवडतात !''

> तेरा–चौदा वर्षांची असताना जर मला वडिलांनी गुरुगृही गाणं शिकवण्यासाठी पाठवलं असतं तर, आज त्रेचाळीसाव्या वर्षी जी मी आहे 'ती' लकरच झाले असते, पण तेव्हा मी किती 'प्रगल्भ' झाले असते, हा प्रश्नच आहे.

**म्हणजे तुमच्या शास्त्रीय गाण्यातून जे व्यक्त होत नाही, ते त्यातून व्यक्त होईल, असं वाटतं का ?''**

''हो, आधी मी कॉलेजमध्ये असताना चित्रपटगीतं खूप गायची, आवडायची.

**''कुठली गाणी ?''**

''खूप आहेत ! मधुमतीतलं 'आजा रे,' तसंच 'जिया बेकरार है...''

**''कोणते संगीतकार आवडायचे ? का ?''**

''मदन मोहन ! मदन मोहनचं क्लासिकल वाटायचं. सलील चौधरी बंगाली लोकधून वगैरेमुळे आवडायचे. तसंच एस. डी. आवडायचे. मराठी भावगीत म्हणजे, मी सांगलीला आले की आशा खाडिलकर – तेव्हाची पाटणकर – काय काय म्हणून दाखवायची. आवडणाऱ्या गाण्यांची यादी फार मोठी आहे ! आणि हा, अख्तरीबाई ! त्यांच्या 'गझल' मला फार आवडतात. अख्तरीबाईचे काही कार्यक्रम मी लखनौ, कानपूरला ऐकलेले आहेत.''


**''श्रोत्यांसाठी गाणं आणि स्वतःसाठी गाणं, असा फरक तुम्ही करता का ?''**

''रियाझ, 'रियाझ' आहे ! आणि मैफलीत 'फायनल प्रॉडक्ट' असतं. त्या क्षणी जरी नाही; पण आधी कधीतरी श्रोत्यांचा विचार केलेला असतो. संयोजक कोण आहेत, हेही बघावं लागतं. आता 'ललितागौरी' हा अस्सल जयपूर घराण्याचा राग आहे, तर गानवर्धनच्या कार्यक्रमाला किशोरीताई आणि मोगूबाई येणार होत्या. त्यांना 'हा राग मी बरोबर गातेय का ?' हे विचारता येईल, असं म्हणून त्या कार्यक्रमात मी 'ललितागौरी' गायले. उत्तरेत मात्र मी अप्रचलित राग शक्यतो गात नाही.''

**''एखादा राग तुम्ही 'गाताच' असं आहे का ?**

''नाही, श्रोताओंके लिए... मतलब, उनको 'काफी


जेव्हा वेदना सतावी
तेव्हा कोण आराम देई?



अमृतांजन. जवळ जवळ शंभर वर्षांपासून डोकेदुखी, पाठदुखी, मुरगळणं आणि शरीराच्या सर्व वेदनांपासून आराम देत आला आहे. वेदनेच्या प्रसंगी तुमचा मित्र–अमृतांजन–लावताच वेदना पळून जाई, आरामाचा लाभ होई.




अमृतांजन
पेन बाम
अमृतांजन लिमिटेड

O & M 1782 MAR

दीपावली शुभचिंतन

# 1210S शिकता येत नाही? TATA 407 लाईट ट्रक वर शिका



परफेक्ट
मोटर ट्रेनिंग स्कूल
गडकरी रंगायतन जवळ, ठाणे.

EXPRESSIONS

नुसते शिकू नका, चांगले शिका परफेक्ट शिका

* कल्याण * वाशी * डोंबिवली * मुंब्रा मोटर ट्रेनिंग स्कूल, रिझवी बाग, रेल्वे स्टेशनसमोर, मुंब्रा (पूर्व) * शहापूर मोटर ड्रायव्हिंग स्कूल, स्टेशन रोड, आसनगाव.

नैसर्गिक शेतीला अत्यंत उपयुक्त आणि 'विपुलाच सृष्टी' चा पुढील भाग....

# केल्याने होत आहे रे..

लेखक : यंदाचे जमनालाल बजाज पारितोषिक विजेते
श्री. अ. दाभोळकर

किंमत रु. २५

मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६ सदाशिव पेठ,
पुणे - ३०.

मेहता बुक सेलर्स
३२२, भाऊसिंगजी रोड,
कोल्हापूर - ४१६ ०१२.


मार्क देते है !''

**मगर दिमागपें एक 'धून' चढी हो तो...**

''उसको कही अलग जगह फेकेंगे, लेकिन वहाँ नही ! एक अनुभव असा आला, की एखाद्या रागाच्या 'हात धुवून' पाठीमागे लागलं, की असं वाटतं, की तो राग आता 'शिळा' झाला ! त्यात नवीन काहीच सुचत नाही. म्हणजे फाटून गेलं ते कापड ! असं नको व्हायला... 'रियाझ म्हणजे काय, तर दर वेळेला काही स्वरसमूह, खटका, पलटा काहीतरी नवीन सुचलं पाहिजे ! पण सारखं घोटल्यानं ते बंद होतं आणि प्रत्यक्षत गाताना तो राग 'शिळा' होतो.''

**''रियाझ करताना बंदिशीतली 'खुबसुरती' शोधणं हाही 'रियाझ' असू शकतो ?''**

''हो, ती बंदिश. त्यात कुठून, कसं जाता येईल. त्या मुखड्याला जोडून कोणत्या गोष्टी सुचताहेत ! कधीकधी थोडं वेडंवाकडं गायलं जातं. शंभर मार्ग धुंडाळले, की कोणतं चांगलं आणि कशाचा मेळ बसत नाही ते समजतं, हासुद्धा रियाझाचा भाग आहे. आता कोणी मला 'रेडिमेड' दिलं तर मी नाही 'खाऊ' शकत !''

**''मैफलीत 'उत्स्फूर्ततेचा भाग' किती असतो ?''**

''समजा, आज 'यमन' घेतला आणि आज पंचम हेच 'स्टेशन'. त्यापुढं जायचं नाही, असं ठरवून रियाझ केला आणि प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या वेळी पेटीवाला 'वेगळं' काही वाजवायला लागला, तर त्याच्याबरोबर गाता आलं तर ! असा विचार मनात येतो. काहीतरी सुचतं; पण ते पुन्हा जोडायचं कसं, हा प्रश्न असतो; पण कधीकधी मी ही 'रिस्क' घेते. स्वतःला संकटात टाकते. संकटात टाकल्याशिवाय 'गाणं' येत नाही. खुमखुमी हवी, की असं करून पाहू या, तसं करू या. कितीही ड्रेस रिहर्सल झालेली असली, तरी थोडी धाकधूक असते मला. असं करून पाहिलं की तुम्ही निर्भय होता.''


**''शास्त्रीय संगीताच्या दृष्टीनं सध्याचा काळ कसा आहे ?''**

''फार चांगला आहे ! संगीताला उज्ज्वल भवितव्य आहे. मी कानपूर आणि पुणं अशी सारखी तुलना करते. इथे तरुणवर्ग खूप ऐकणारा आहे, गाणाराही आहे. सध्या शास्त्रीय संगीत 'शिखरावर' आहे. त्याची जोरदार हवा आहे. काही मुलं खूपच मेहनत करताहेत.''

**''उदाहरणार्थ ?''**

''संजीव अभ्यंकर, अश्विनी, आरती अंकलीकर. (आरतीनं आपलं गाणं खूप बदललं आहे, नुकतंच मी तिचं गाणं ऐकलं.) विजय कोपरकर, विजय सरदेशमुख आहे. सांगलीची मंजिरी असनारे म्हणून चांगली मुलगी आहे''

**''संगीत क्षेत्रात खूप गटबाजी आहे, काही जणांचा खूप 'उदोउदो' केला जातो, असं काही जणांना वाटतं. तर सध्याची एकंदरीत परिस्थिती कितपत**



प्रसिद्धी मिळाली नसती तरीही गायलेच असते.

**'निरोगी' वाटते ? काही वेगळं करू पाहणाऱ्याला 'लोकं' स्वीकारतात, पण संयोजक कचरतात असं काही आहे का ?''**

''संयोजक शेवटी 'रिस्क' घेणारे नसतात !''

**''सवाई गंधर्वाच्या वेळी असं नाही झालं....''**

''तो एक 'चमत्कार' होता. तेव्हा 'वीणा सहस्त्रबुद्धे' नवीन होती, कुठूनतरी टपकली होती ! मी स्वतः तिथे गायच्या आधी, सवाई गंधर्व महोत्सव पाहिलासुद्धा नव्हता ! त्याबद्दल ऐकलं मात्र खूप होतं. पहिल्यांदाच मी 'एवढी' गर्दी पाहिली. म्हटलं अरे बापरे ! ही १९८४ मधली गोष्ट आहे. तिथलं आदल्या दिवशीचं एक गाणं ऐकलं. 'बागेश्री'च होता. ते गाणं ऐकल्यानंतर मी म्हटलं, 'हम्मारा बागेश्री इतना तो हैच ! इससे ज्यादा बुरा हम गातेच नही !' पण नाही म्हटलं, तरी थोडासा नर्व्हसनेस आला होता. एकतर माझं खूप 'नाव' होणार होतं किंवा मग मला कोणीच ओळखणार नव्हतं ! म्हटलं, देवानं आपल्याला 'कंठ' चांगला दिला आहे. सूर, ताल, समजण्याएवढी बुद्धी दिली आहे. असं म्हणून मी गायले आणि लोकांनी ते खूप उचलून धरलं. त्यानंतर त्याची कॅसेट ऐकताना मला वाटलं की, इथे चुकले मी, तिथे चुकले, हे काय गायले मी ! असं वाटलं, पण लोकांनी तेच उचलून धरलं.''

''एक तर माझं नाव नसल्यानं (मिस्किलपणे) लोकं 'वडे' खायला बाहेर पडली, आणि मी गायला बसले. मी 'षड्ज' वगैरे लावला. स्थायी भरली तशी हळूहळू 'स्थांयी चांगली भरल्येय, आवाज बरा आहे, ऐकावं जरा' असं करत-करत बाहेरची लोकं आत आली ! ते 'गाणं' मालिनी राजूरकरांचं नव्हतं, किशोरीताईचं नव्हतं. ते 'माझं' गाणं होतं ! ते 'माझं' रसायन होतं. माझा 'मसाला,' होता. बॉम्बचं जसं असतं ना की, फुटला तर फुटला नाही तर 'फुसका !''

त्यानंतर कार्यक्रम सुरूच झाले. पण नंतरही मी 'प्रत्येक' कार्यक्रम उत्तम तयारी करूनच गायले. काय होतं, सुरवातीला तुम्हाला खूप झगडावं लागतं.

**''काही 'उपेक्षित' कलावंतांकडे 'इतकं' असतं.... माझे वडील काही बंदिशी अशा गायचे की.....''**

''हो, त्यांच्याकडून म्हणजे वामनरावांकडून (त्यांना मी काका म्हणते) मी महिना-दीड महिन्यात, 'ख्याल', ती स्थायी 'भरायची' कशी ? सभेच्या आधी मुखडा पकडण्याच्या आधी जी 'कामगत' केली जाते, ते मी त्यांच्याकडून शिकले. भीमपलासची 'रे बिरहा' मी त्यांच्याकडून शिकले. ती बंदिश मी जिथे-जिथे गायले तिथे मला खूप 'वाहवा' मिळाली. त्या बंदिशीत त्यांनी जे केलं, ते मी इतर वेळाही करून पाह्यलं.''

**तुम्ही किती वेळ शिकलात, या पेक्षा काय शिकलात याला महत्त्व आहे. होलसेलमध्ये काही जण ताना, लयकारी 'सप्लाय' करतात. विष्णू दिगंबर किंवा कुमारजी यांना मात्र असं वाटतं की, 'जे गाणं मला तिकडे यावंसं वाटतं, तेच मी तुम्हालाही देईन.' या लोकांनी 'मूल्यांवर' प्रेम केलं; तर श्रोत्यांना सुसंस्कृत करणं हे तुमचं ऋण आहे, असं तुम्हाला वाटतं का ?''**

''मी इथे शिकवते. मला शिकवण्याची फार आवड आहे. वेगवेगळ्या स्तरांवर ! मी सध्या वीस-पंचवीस मुलींना शिकवते आहे. त्यांना ते 'समजेल' अशा रीतीनं मला शिकवावं लागतं आणि तुम्ही 'ऋण' जे म्हणालात, तर 'मला जे जे येतंय ते सारं देऊन जायचंय !' मला शिकवायला आवडतं. मुलींकडून मी फीसुद्धा घेत नाही. मात्र मला जसा वेळ असेल तसं मी शिकवते. मी एक आठवडा इथं असले की, दररोज तीन-तीन तास मुलींना घेऊन बसते.''

**''पुण्यामध्ये विविध गायकांनी एकत्र येऊन, एकमेकांना आपलं गाणं ऐकवावं असं वाटतं का ?''**

''तसा विचार माझ्या मनात आला होता. एखादा छोटा ग्रूप असावा. 'आनंद निधान' असं मी म्हणीन ! मला काय वाटतं, की माझ्या ज्या मुली आहेत त्या, शिवाय ज्यांना सांगीतिक चळवळीत रस आहे, अशा व्यक्ती यांना एकत्र जमवायचं आणि त्या मुलींना छोट्या मंचावर गायला लावायचं. तटस्थपणे बघून त्यांच्या गाण्यात काय सुधारणा करता येईल तेही मला ठरवता येईल.''

> 'सवाई गंधर्व' महोत्सवाबद्दल ऐकलं खूप होतं, पण प्रत्यक्ष पाहिला नव्हता. पहिल्यांदाच मी एवढी गर्दी पाहिली आणि म्हटलं 'अरे बापरे !' नाही म्हटलं तरी थोडासा नर्व्हसनेस आला होता. एक तर माझं खूप नाव होणार होतं किंवा मग मला कुणीच ओळखणार नव्हतं.

**''समजा, तुम्हाला 'प्रसिद्धी' मिळाली नसती तरी तुम्ही गायला असतात ?''**

'' 'सवाई गंधर्वामुळे' मी 'स्पीड अप' झाले. तिथे मी नसते गायले तर मी खूप हळूहळू असं माझं गाणं चालूच ठेवलं असतं. तुमच्या 'संवाद'साठी मुंबईला गायले तेव्हाही 'हवा' झालीच, पण तेवढ्यापुरती !''

**'' 'स्टारडम' मिळायलाच पाहिजे, असा अट्टाहास कलाकारांनी किती धरायचा ?''**

''मी गातच होते. कानपूरलाही मी गातच होते. कोणी ऐको अगर न ऐको. नैराश्य येण्याच काही कारण नाही. शेवटी कलेचं प्रयोजन काय आहे, तर आनंद मिळतो म्हणून ! म्हणूनच आपण गातो.''

**''मध्यंतरी आवाजाला काही त्रास होत होता का ?''**

''मला टॉन्सिलचा त्रास आहे. ते उद्भवलं की एकदम....''

**''आवाजाचा लगाव तुम्ही 'जाणीवपूर्वक' केला आहे का ?''**

''आधी मी खूप उंच स्वरात गायची. तात्या म्हणजे

'घराणं' हा शब्द आमच्या घरी कधी उच्चारलाच गेला नाही. मी ग्वाल्हेर घराण्याची आहे, हे मला पुण्याला आल्यावर समजलं.

माझा भाऊ मला म्हणाला, "तुला क्लासिकल गायचं असलं तर खालच्या पट्टीत गा !" काळी पाचच्या थोडा खाली असा मी आवाज केला. मग काळी चारमध्ये खोल आवाज गेल्यासारखं वाटलं. आधी माझ्या आवाजाचा 'पीच' कोणता तेच समजत नव्हतं. मग ठरवलं की 'काळी पाच' मध्येच गायचं. त्यातच 'प्रयोग' करायचे. सारखं बदल करण्यामध्ये अनिश्चितता असायची."

**"तुमचं 'व्यक्तिमत्त्व' गाण्यातनं दिसतं असं कधी वाटतं का ? तुमचं गाणं 'स्वाभाविक' वाटतं......".**

"अवघड आहे ! यासाठी प्रयास करावे लागले. 'पण आपलं व्यक्तिमत्त्व आहेच कुठे ?' आपल्या अस्तित्वाचं ज्ञान मला फार उशिरा झालं. मी नृत्य केलंय, नाटक केलंय, 'ऐसा बोलो तो ऐसा बोल दिया' असं होतं ! आवाज होता, पण अनुकरण करणारा आवाज होता !"

**"मालिनी राजूरकर सहजतेनं गातात, तर किशोरी आमोणकरांच्या गाण्यात फार बांधीवपणा जाणवतो."**

"त्यांची (मालिनीताईंची) बैठकच वेगळी आहे. मला आवडतं त्यांचं गाणं ! (साडीचा पदरबिदर करून ॲक्शन करून दाखवतात.) 'पोळ्या लाटल्या,' 'कुकरची शिट्टी वाजत्येय !' आणि त्याच आवाजात थांबा जरा, मी 'दोन-ताना' मारून येते, असं गाणं म्हणजे मालिनीताई !"

"त्यांच्या उलट म्हणजे किशोरीताई. बिल्कुल मिजाज, नखरा !. नखरेसे काम करती है वहाँ सब प्लॅन्ड होता है कैसे भी बोल लिया असं नाही. किशोरीताईचं नेचरच वेगळं आहे. नजाकत आहे, सारं रेखीव आहे !"

**"नृत्य आणि नाटकाच्या अनुभवाचा, गाणं 'सादर' करताना काही उपयोग होतो का ?"**

"हो, लोकांची भीती वाटत नाही ! दहा हज्जार माणसं असोत, नाही तर पंधरा हज्जार ! इतकी गर्दी पाहूनही मी, 'मी माझ्यात' राहू शकते. नृत्यामुळे मला लयीचा आनंद अधिक मिळतो. अभिनयाचा प्रश्न येत नाही. कारण मी 'ठुमरी' वगैरे गात नाही."

**"का ?"**


"नाही, नेचरच नाही."

**"मग टप्पा ?"**

"हो, तो शिकायला मिळाला तर जरूर शिकेन ! तयार करीन.

■


मो प्लस ३



नाही, खरं ना? आता ती काळजी

सिमॉस बँकेच्या शाखेत सुरु
या '**कॉसमॉस स्वागत कक्षा**'ला
भेट द्या. तुमचाच पैसा,
साठी अधिक पैसा कसा कमावेल
माहिती तिथे मिळेल.
तेदारांना परिपूर्ण आर्थिक सेवा
ाठी आम्ही टाकलेलं नेमकं
— "कॉस्मो प्लस ३" योजना

तत्पर सेवा
सस्मित सेवा
तुमचा आणखीन एक कमावता हात!

कॉसमॉस बँक
पुणे-मुंबई (शेड्यूल्ड बँक)

दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
मुख्य कार्यालय : २६९, २७०, शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

सप्रेम भेट


राघवेन्द्र पाटील

दूरध्वनी
६६६११९

२ अशोक अपार्टमेन्ट्स,
२१४ कोरेगांव पार्क,
पुणे - ४११००१.